**स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण**

पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण,आडगाव, नाशिक-पिन ४२२००३

दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१० **E Mail - pilcbnskr@gmail.com**

---

## प्रेसनोट

दिनांक :- २१/१०/२०१८

## मालेगाव शहरात धारदार शस्त्रे हस्तगत - स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

---

जिल्हयातील कायदा व सुव्यवस्था परिस्थितीवर नियंत्रण तसेच गुन्हेगारीस प्रतिबंध होणेसाठी नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.** यांनी सत्वर करण्याचे आदेश दिलेले आहे. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे यांचे पथकाची धडक कारवाई सुरू आहे. मालेगाव शहरातील कल्लु स्टेडीयम परिसरात अवैधरित्या धारदार शस्त्रे बाळगणारे एका विधीसंघर्षितास स्थागुशाचे पथकाने ताब्यात घेवुन ०५ धारदार शस्त्रे जप्त केली आहे.

आज दि. २१ ऑक्टोबर रोजी मध्यरात्रीचे सुमारास स्थानिक गुन्हे शाखेचे पथकातील अधिकारी व कर्मचारी मालेगाव शहरात गुन्हेगार चेकिंग व मालाविरूध्दचे गुन्हयांना प्रतिबंध होणेसाठी गस्त घालत होते, दरम्यान पथकास मिळालेल्या गुप्त बातमीप्रमाणे कल्लु स्टेडियम परिसरात एका इसमाचे कब्जात धारदार शस्त्रे असुन तो काहीतरी गुन्हा करण्याचे तयारीत असलेबाबत माहिती मिळाली. त्यानुसार स्थागुशाचे पथकाने कल्लु स्टेडियम परिसरात सापळा रचुन एका विधीसंघर्षित बालकास ताब्यात घेतले. त्याचे कब्जातुन **०४ धारदार तलवारी व ०१ कोयता अशी ०५ घातकशस्त्रे हस्तगत** करण्यात आली. सदर बाबत पवारवाडी पोलीस ठाणे ॥ गुन्हा रजि.नं. ४८/२०१८ **भारतीय हत्यार कायदा कलम ४/२५** प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **मा.पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.** व अपर पोलीस अधीक्षक मालेगाव **श्री. नीलोत्पल सो**. यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेचे **पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे,** सपोनि संदिप दुनगहु, सपोउनि सुनिल आहिरे, पोहवा वसंत महाले, राजु मोरे, सुहास छत्रे, पोना राकेश उबाळे, देवा गोविंद, पोकॉ फिरोज पठाण, रतिलाल वाघ यांचे पथकाने सदर कारवाई केली असुन आगामी काळात गुन्हेगारीस आळा बसण्यासाठी सतत कारवाई सुरू राहणार आहे.